गोमंतक

# पौराणिक साहित्यावर राष्ट्रीय परिसंवाद

## दोनापावलात १८ पासून आयोजन : केंद्रीय साहित्य अकादमी, कला व संस्कृती संचालनालयाचे सहकार्य

**पणजी, ता. १५ : केंद्रीय साहित्य अकादमी आणि कला व संस्कृती संचालनालय, गोवा सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने सेंटर फॉर स्टडीज ऑफ मायथॉलॉजी ॲण्ड कल्चर गोवा ही संस्था पश्चिम भारतातील पौराणिक साहित्य या विषयावर दोन दिवसांचा राष्ट्रीय परिसंवाद दोनापावला येथील इंटरनॅशनल सेंटर गोवा येथे १८ व १९ जानेवारी २०२० रोजी आयोजित करीत आहे. त्यात देशातील अभ्यासक सहभागी होणार आहेत.**

पश्चिम भारतातील क्षेत्रपाल देवतांच्या संदर्भात होणार असलेल्या या परिसंवादाचे उद्घाटन मानववंश शास्त्रज्ञ तसेच लोकसंस्कृतीचे गाढे अभ्यासक प्रो. भक्तवत्सल रेड्डी यांच्या हस्ते होणार असून, ते परिसंवादाचे बीजभाषण करणार आहेत. याप्रसंगी साहित्य अकादमीचे संचालक गुरूदास पिळर्णकर हे उपस्थित राहतील.



**राजन गवस**

उद्घाटन सत्राला जोडून असलेल्या सत्रात क्षेत्रपाल देवतांची आवधारणा आणि मौखिक परंपरा या विषयांवर डॉ. पाठक (गुजरात) आणि डॉ. पांडुरंग फळदेसाई (गोवा) हे प्रपत्र सादर करणार असून, प्रख्यात अभ्यासक रंगनाथ पाठारे (महाराष्ट्र) अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

दुपारी २ वाजता होणाऱ्या सत्रात क्षेत्रपाल देवता आणि त्यासंबंधीच्या लोकपरंपरा या विषयांवर अशोक राणा (महाराष्ट्र) आणि डॉ. जयंती नायक (गोवा) आपले शोधनिबंध सादर करतील, या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. नारायण देसाई भूषवतील. दुपारी चार वाजताच्या सत्रात अध्यक्षस्थानी साहित्यिक राजन गवस असतील. या सत्रात क्षेत्रपाल देवतांच्या संदर्भातील मिथके, दंतकथा आणि लोकसाहित्य या विषयांवर हसू यात्रिक (गुजरात) आणि तन्मय केळकर (महाराष्ट्र) हे आपले पेपर सादर करणार आहेत.

रविवारचे सत्र सकाळी १० वाजता सुरू होणार असून, सत्रात क्षेत्रपाल देवता आणि त्यांच्या मिथके संदर्भात डॉ. प्रकाश खांडगे (महाराष्ट्र) आणि विनायक खेडेकर (गोवा) हे आपले शोधनिबंध सादर करतील. या सत्राचे संचालन गुजरातचे विनोद जोशी हे करतील. या सत्रानंतर क्षेत्रपाल दैवतांचा प्रतिकात्मक विकास या विषयाच्या संदर्भात राजेंद्र केरकर (गोवा) आणि आशा गोहिल (गुजरात) या प्रपत्र सादर करतील. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रतापसिंह वेळीप काणकर (गोवा) हे असतील.

परिसंवादाच्या समारोपाच्या सत्रात क्षेत्रपाल देवतांची पश्चिम भारतातील लोकप्रियता या विषयावर गोव्याचे ॲड. जॉन फर्नांडिस आणि सिंधी भाषेतील ख्यातनाम लेखक कलाधर मुटवा हे आपले शोधनिबंध सादर करतील. या सत्राचे अध्यक्षपद गोव्याचे लोककला अभ्यासक श्याम वेरेकर हे भूषवितील. दोन दिवस चालणारा ह परिसंवाद सर्व विद्यार्थी अभ्यासक आणि पुराण साहित्यात रूची दाखविणाऱ्यांसाठी खुला राहील. या परिसंवादाला जोडून साहित्य अकादमीच्या प्रकाशनांचे प्रदर्शन आणि विक्री यांचे आयोजन करण्यात आले आहे.